

# निरोगी जनावरांची लक्षणे

आपल्या गोठ्यातील जनावरे निरोगी असणे महत्त्वाचे आहे. जनावरे निरोगी असतील तरच आपला आर्थिक फायदा होईल. आपल्याला निरोगी व आजारी जनावरे ओळखता आली पाहीजे.

**निरोगी जनावराची लक्षणे**

- जनावरांचे डोळे पाणीदार असावेत, निस्तेज, पाणी-पू वाहणारे नकोत. कान टवकारलेले, मोकळेपणाने हालचाल करणारे असावेत. लालसर, फिक्कट पडलेले नकोत. नासाग्र हे कोरडे नसावे, ते कायमच ओले, द्रवयुक्त असावे.
- जनावराची त्वचा मऊ, सतेज, उभारलेले केस नसलेली अशी असावी. जनावराची कातडी ही मऊ व चमकदार पाहिजे. कातडी चिमटीत ओढताना झटकन वर आली पाहिजे. संकरित गाईत हिवाळ्यात वाढलेले मोठे केस उन्हाळ्यात कातडीलगत कापावे म्हणजे शरीरातील उष्णता बाहेर फेकण्यास मदत होईल. कानात केस ठेवू नयेत म्हणजे गोचिडांना लपण्यास जागा राहत नाही.
- त्वचा ही अति गरम वा अति थंड असू नये. शरीराचे तापमान गाईचे १०० अंश ते १०२ अंश फेरनहाईटपर्यंत असू शकते. कातडीचे आजार, केस राठ होणे, गळणे म्हणजे कुठल्यातरी क्षाराची कमतरता आहे.
- जनावरांच्या पाठीवर थाप मारल्यास कातडी थरथरली, तर ते चांगल्या आरोग्याचे लक्षण आहे. पाणी मुबलक प्रमाणात असल्यास जनावरांना दररोज धुवावे व खरारा करावा, यामुळे रक्ताभिसरण चांगले होते.
- दुधाळ जनावरास दिवसातून तीन वेळा तरी पाणी पाजावे. जनावरास स्वच्छ पाणी पाजावे.
- जिभेच्या मागे असलेल्या पडजिभेची सूज किंवा दाह यामुळे जनावरे घोरल्यासारखा आवाज काढतात. जनावरांना जीभ बाहेर काढणे, वळवळणे अशा सवयी आढळतात. याचे कारण म्हणजे क्षारांची कमतरता अथवा चारा खाद्यातील तोचतोचपणा होय. पाणी पिताना जिभेने जनावर पाणी उडवत असेल, तर दातामध्ये अथवा तोंडात जखम असू शकेल, तोंड उघडून बघून घ्यावे.
- निरोगी जनावर शांत व नियमितपणे रवंथ करते. गोठ्यातील वातावरण शांत नसल्यास, मोठा आवाज झाल्यास जनावरे घाबरतात, यामुळे रवंथ करणे बंद होते. जनावरे साधारणतः चार ते सहा तास रवंथ करतात. जिभेत, दातात जखम असेल, तर जनावरे रवंथ नीट करत नाहीत. रवंथ करताना येणारा पांढरा फेस म्हणजे आरोग्य उत्तम आहे, तोंडात घास (चारा वैरणीचा) नसतानाही जनावरे रवंथ करतात, हे चांगल्या आरोग्याचे लक्षण नाही. यासाठी तोंड उघडून तपासून घ्यावे.
- जिभेचा रंग चांगल्या जनावरांत लालसर गुलाबी असावा, तसेच ती ओलसर खरखरीत असावी. जी जनावरे कमी रवंथ करतात, त्यांच्यात पोटफुगीचे प्रमाण जास्त असते. जास्त चारा बारीक करून दिल्यास रवंथ कमी होते.
- दुभते जनावर दिवसातून १२ ते १४ लिटर मूत्र टाकते. लघवीचा रंग निरोगी जनावरात किंचित पिवळसर व सफेद (रंगहीन) असतो. आजारी जनावरांत ती थोडी थोडी, अति लाल व कष्टाने होते. अति लाल लघवी स्फुरदाची कमतरता वा विषबाधेमुळे होऊ शकते
- रोगी जनावराचे शेण हे अति घट्ट किंवा अति पातळ, रक्तमिश्रित, घाण वास येणारे असे असू शकते. काळपट हिरव्या रंगाचे, घडी पडल्यासारखे शेण हे निरोगी जनावराचे असते. शेणाचा रंग काळाकुट्ट असू नये. पोटाचे आजार असल्यास शेणाचा रंग, वास बदलतो. शेणातील चाऱ्याची/ गवताची काडी अर्धा सेंटिमीटरपेक्षा मोठी नसावी.
- वैरणीची कुट्टी करताना सव्वा ते दीड इंचाचे तुकडे करावेत, यामुळे दूध उत्पादन वाढते. हिरवा चारा हा सकाळी ते दुपारपर्यंत जास्तीत जास्त द्यावा, यामुळे स्निग्धांशाचे प्रमाण चांगले मिळते.
- भाताचा पेंढा, उसाचे वाढे या चाऱ्यात ऑक्झलेटचे प्रमाण जास्त असते. अशा चाऱ्यांमुळे कॅल्शिअम क्षाराच्या शोषणात अडथळा निर्माण होतो. दुभत्या जनावरास १०-१५ किलोपेक्षा जास्त मूरघास देऊ नये.
- भुसा, काड असे दुष्काळी खाद्य कायम दिल्यास कॅल्शिअम, फॉस्फरस या खनिजांची कमतरता निर्माण होते. यासाठी उपलब्ध चाऱ्यावर प्रक्रिया करावी. दुधाळ जनावरांना त्यांच्या आहारात शिफारशीनुसार क्षार मिश्रण दिले पाहिजे.


**प्रकाशन**

**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, संशोधन अनुदान अंतर्गत**

www.mafsu.in

www.knpcvs.in



**✲ मार्गदर्शक ✲**

**कर्नल प्रा. (डॉ.) ए. एम. पातुरकर**
मा. कुलगुरु, मपमविवि, नागपुर

**डॉ. एस. व्ही. उपाध्ये**
अधिष्ठाता, पशुविज्ञान विद्याशाखा, मपमविवि, नागपुर

**डॉ. एन. व्ही. कुरकुरे**
संचालक संशोधन, मपमविवि, नागपुर

**डॉ. ए. यु. भिकाने**
संचालक विस्तार शिक्षण, मपमविवि, नागपुर

**डॉ. व्ही. डी. आहेर**
सहयोगी अधिष्ठाता
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

**✲ संकलन ✲**

**डॉ. स्मिता आर. कोल्हे**
संशोधन प्रकल्प प्रमुख, पशुवैद्यकीय व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

**संपर्क : टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३२६८ सकाळी १० ते सायं. ६ वा.**